# —: प्रेसनोट :—

दि. ११/०३/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | १४/२०२२ |
| ३ | कलम | ७ भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीताचे नाव व कार्यालय | बलराम राजेंद्रप्रसाद सिंह, वय २८ वर्षे, नोकरी – लिपीक टंकलेखक, परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, एम.टी.एन.एल. बिल्डींग नं.२, ५ वा माळा, एम. जी. रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ४०,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ४०,०००/– |
| ७ | हस्तगत केलेली लाचेची रक्कम | रु. ४०,०००/– |
| ८ | थोडक्यात माहिती | तक्रारदार हे जय भगवान रोड कॅरीअर ट्रान्सपोर्ट कंपनीचे सुपरवायझर असून त्यांच्या कंपनीचे ०४ ट्रेलर परराज्यातून ओव्हर सायझिंग मशिनरी/माल घेवून मुंबई पोर्ट येथे येणार होते. ओव्हर सायझिंग मशिनरी/माल ट्रेलरने रोडने घेऊन जाण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, फोर्ट, मुंबई यांची परवानगी घ्यावी लागते. त्यासाठी प्रति ट्रेलर रुपये २०००/– इतकी शासकीय फी आहे. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी शासकीय फी नमूद कार्यालयात भरना केली होती.<br>परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, फोर्ट मुंबई, येथील संबंधित लिपीक टंकलेखक बलराम राजेंद्रप्रसाद सिंह यांनी शासकीय फी व्यतिरिक्त प्रति ट्रेलर १०,०००/– रुपये असे एकूण ४०,०००/– रुपये लाच म्हणून तक्रारदार यांच्याकडे मागणी केली होती व ते पैसे दिले तरच ट्रेलरवरून ओव्हर सायझिंग मशिनरी/माल आणण्यासाठी लागणारी परवानगी मिळेल असे सांगितले होते.<br>तक्रारदारास लोकसेवकास लाच दयावयाची इच्छा नसल्याने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे दि. १०/०३/२०२२ रोजी प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>दि. ११/०३/२०२२ रोजी केलेल्या पडताळणीत यातील लोकसेवकाने तक्रारदार यांना ट्रेलरची परवानगी देण्याकरीता रू. ४०,०००/– रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने. सापळा कारवाई दरम्यान नमुद लोकसेवकाने रू. ४०,०००/– लाचेची रक्कम तक्रारदाराकडून स्विकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आल्याने त्यांच्या विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

( गणेश कुंभार )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ–acbmaharastra.gov.in
ईमेल– १) acbwebmail@mahapolice.gov.in
२) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज–www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००